# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक २८ जून, २०२४
## (दुपारी १२.०० वाजता)

**एक** : **प्रश्नोत्तरे.**

**दोन** : **कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**गृहनिर्माण मंत्री** : "झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन** : **म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**चार** : **म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**पाच** : **सर्वश्री अंबादास दानवे**, सतेज ऊर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, सचिन अहिर, अरुण लाड, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, विलास पोतनीस, किरण सरनाईक, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात सततचा पाऊस, नापिकी, दुष्काळ, टंचाई, अवकाळी, कर्जबाजारीपणा, कृषी विभागाच्या अपुऱ्या सोईसुविधा यामुळे शेतकरी संकटात आलेला असणे, परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये झालेली वाढ, शेतमालाला हमीभाव न मिळणे, बियाणे, खते यांच्या दरात झालेली प्रचंड वाढ, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने दुष्काळग्रस्त १०२१ महसूल मंडळांमध्ये सवलती जाहिर करुनही अद्याप शेतकरी वंचित असणे, पीक विम्याचे नियमितपणे हप्ते भरुनही शेतकरी पीक विम्यापासून वंचित राहणे, तथापि, विमा कंपन्या दिवसेंदिवस मालामाल होणे, राज्यात एकीकडे भीषण पाणी टंचाई असताना टँकर माफीयांकडून नागरिकांची होत असलेली लूट, पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी राबविण्यात आलेली "हर घर नल का जल" योजना अपयशी ठरणे, चारा छावण्या उभारण्याबाबत होत असलेले दुर्लक्ष, परिणामी पशुधनाचे झालेले नुकसान, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी संकटात असताना शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्याकडे होत असलेले जाणीवपुर्वक दुर्लक्ष, माहे जानेवारी ते मे, २०२४

अमुद्रित प्रत

या कालावधीत झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई अद्याप न मिळणे, कांद्यावर निर्यात बंदी असल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी शासनाच्या चुकीच्या निर्यात धोरणांमुळे अडचणीत आलेला असणे, शेतकऱ्यांना योग्य तो लाभ मिळण्यासाठी कांदा, सोयाबीन, कपाशी, तूर, हरभरा, भुईमूग, धान, उडीद, मूग, हळद, मिरची इ. पिकांना योग्य तो दर मिळवून देण्यास शासनाला आलेले अपयश, परिणामी शेतकऱ्यांचे होत असलेले आर्थिक नुकसान, धान, संत्रा उत्पादक शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित असणे, दूध उत्पादक शेतकऱ्यांना सरकारने घोषित केलेले अनुदान अद्यापही मिळालेले नसणे, राज्य सरकारने ७५ हजार पद भरती करण्याच्या घेतलेल्या निर्णयाची अजूनही पुर्तता केलेली नसणे, त्यामुळे अनेक तरुण-तरुणी रोजगारापासून वंचित असणे, जुन्या पेन्शन योजनेत असलेल्या त्रुटी, शिक्षकांच्या संच मान्यतेमध्ये असलेल्या त्रुटी, शक्तिपीठ महामार्गास शेतकऱ्यांचा विरोध असून प्रकल्प रेटण्याचा सुरु असलेला प्रयत्न, स्मार्ट प्रिपेड योजनेमुळे ठराविक उद्योजकांना फायदा होणार असणे, वीज दरामध्ये झालेली वाढ, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणारी भरती प्रलंबित असणे, महागाईत झालेली वाढ, राज्य शासनामार्फत घेण्यात आलेल्या विविध परिक्षांमध्ये झालेली अनियमितता, तसेच गत दोन वर्षात शासनाच्या विविध विभागामध्ये अनेक भ्रष्टाचार व गैरव्यवहार उघडकीस येणे, कृषी उद्योग विकास महामंडळामध्ये मोठ्या प्रमाणावर होत असलेला भ्रष्टाचार, मेटाल्डिहाइड कीटकनाशके, कापूस साठवणपिशव्या, फवारणी पंप, डिजिटल मृदा आर्द्रता संवेदक या निविष्ठांच्या खरेदी प्रक्रियेमध्ये झालेला गैरव्यवहार, सेंद्रीय शेतीसाठीचा निधी अधिकाऱ्यांच्या जाणीवपुर्वक दुर्लक्षामुळे अखर्चित राहणे, चंद्रपूरच्या महाऔष्णिक वीज निर्मिती केंद्रात निविदा प्रक्रिया व साहित्य खरेदीत करण्यात आलेला भ्रष्टाचार, आदिवासी विकास विभागात फर्निचर खरेदीमध्ये झालेला कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार, सार्वजनिक आरोग्य विभागात टक्केवारी, वसुली, बदल्या-पदोन्नतीत गैरप्रकार, जेष्ठता डावलून पदस्थापना, औषध खरेदीमध्ये झालेला हजारो कोटींचा गैरव्यवहार, कामगार विभागांतर्गत बांधकाम कामगार मंडळामध्ये विविध योजनांमध्ये झालेला गैरव्यवहार, राज्य उत्पादन शुल्क विभागात सुरु असलेला भ्रष्टाचार तसेच आकृतीबंध पुनर्रचनेत झालेला गैरव्यवहार, अन्न व औषध प्रशासन विभागामध्ये सुरु असलेला भ्रष्टाचार, महसूल विभागात वाढलेला भ्रष्टाचार व त्यामुळे सर्वसामान्यांची होत असलेली परवड, वाळू धोरण राबविण्यास शासनास आलेले अपयश, त्यामुळे सर्व सामान्य नागरिकांची वाळू माफियांकडून होत असलेली फसवणूक, सातारा जिल्ह्यातील झाडाणी, ता. महाबळेश्वर गावात उच्चपदस्थ शासकीय अधिकाऱ्यांसह तेरा जणांनी ६४० एकर जमीनीची अत्यल्प दरात केलेली खरेदी, निवडणूक रोख्यांच्या

असुधारित प्रत

माध्यमातून देणग्या देणाऱ्या कंपन्यांना राज्यातील विविध प्रकल्पांची कोट्यवधी रुपयांची देण्यात आलेली कंत्राट, संचालक, नगररचना, पुणे यांनी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचे योग्य प्रकारे नियोजन न केल्यामुळे हा निधी व्यपगत होणे, लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या कालावधीत राजकीय दबावापोटी अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार, पाणी पुरवठा विभागात जलजीवन मिशन अंतर्गत कामाचे वाटप करताना ई-निविदा न राबविता केलेला गैरव्यवहार, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

## - मध्यंतर -

**(दुपारी २-०० वाजता)**

**सहा : उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री सन २०२४-२०२५ चा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करतील.**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २७ जून, २०२४

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

अस्थायिक प्रत